ePaper
पाकला जशास तसं प्रत्युत्तर; दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयाबाहेर 'बुलडोझर' कारवाई

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™






पुनावळेत कचरा डेपो नव्हे; ऑक्सिजन पार्कच होणार!

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 19 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## 'वंदे मातरम' अन देशाचे विभाजन हे काँग्रेसचे पाप..' अमित शहा यांचा घणाघात..

# 'काँग्रेसकडून देशाचा व हुतात्म्यांचा अपमान!'

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीतावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काँग्रेस पक्षावर अत्यंत तीव्र शब्दांत निशाणा साधला आहे. काँग्रेसनेच १९३७ मध्ये लांगूलचालन आणि तुष्टीकरणाच्या राजकारणापोटी 'वंदे मातरम्'चे दोन तुकडे केले होते आणि त्यातूनच देशाच्या फाळणीचा पाया रचला गेला, असा थेट आरोप त्यांनी केला. देशाने 'वंदे मातरम्'च्या विभाजनाचे गंभीर परिणाम यापूर्वी भोगले असून आता जनता पुन्हा तशी चूक घडू देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.**




### काँग्रेसकडून हुतात्म्यांचा अवमान : अमित शहा

गृहमंत्री पुढे म्हणाले की, 'वंदे मातरम्'च्या निर्मितीला १५० वर्षे पूर्ण होत असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ही ऐतिहासिक चूक सुधारण्याचे काम केले आहे. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या या अमर कृतीचे संपूर्ण गायन करून राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट करण्याचा आणि सर्व शासकीय कार्यक्रमांमध्ये ते पूर्ण गाण्याचा निर्णय घेत त्यास कायदेशीर चौकटही दिली आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने काँग्रेस मुख्यालयात पूर्ण 'वंदे मातरम्' गायले गेले होते, त्यावेळी सोनिया गांधी काहीशा नाराज दिसल्या होत्या. त्यावर स्पष्टीकरण देताना काँग्रेस नेत्यांनी सांगितले होते की, मल्लिकार्जुन खर्गे बऱ्याच वेळेपासून उभे असल्याने त्या त्यांच्यासाठी खुर्ची मागवत होत्या. मात्र, या घटनेच्या अवघ्या चार दिवसांनंतर काँग्रेसने त्यांचे नेते 'वंदे मातरम्'चे केवळ दोनच कडवे गातील, अशी भूमिका जाहीर केली.

या निर्णयावर प्रहार करताना अमित शहा म्हणाले की, काँग्रेस कार्यकारिणीने घेतलेला हा निर्णय धक्कादायक आणि देशविरोधी आहे. पक्षाच्या १९३७ च्या ठरावाचा आधार घेत या महान राष्ट्रीय गीताची केवळ दोनच कडवी गाण्याचा घेतलेला निर्णय निषेधार्ह आहे. १९३७ मध्ये काँग्रेसने मुस्लीम तुष्टीकरणासाठी 'वंदे मातरम्'चे तुकडे करून देशाच्या विभाजनाची बीजे रोवली होती, ज्यातून द्वि-राष्ट्र सिद्धांताला बळ मिळाले आणि पुढे भारताची फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली, याची जाणीव त्यांनी संपूर्ण देशाला करून दिली.

मात्र, काँग्रेसने घेतलेला निर्णय या कायदेशीर निर्णयाचा अवमान करणारा असून तो त्यांच्या घोर तुष्टीकरण धोरणाचीच साक्ष देतो. व्होट बँकेच्या स्वार्थासाठी काँग्रेसने केवळ बंकिमचंद्रांच्या अमर कृतीचाच अनादर केलेला नाही, तर 'वंदे मातरम्'चा जयघोष करत देशाच्या स्वातंत्र्यासाठी फासावर गेलेल्या आणि तुरुंगवास भोगलेल्या लाखो हुतात्म्यांचाही घोर अपमान केला आहे.

### काँग्रेस संसदेच्या कायद्याला नाकारत असल्याचा आरोप

काँग्रेस आज संसदेने पारित केलेल्या कायद्याला नाकारून स्वतःच्या पक्षाच्या १९३७ च्या जुन्या ठरावाला प्राधान्य देत असल्याचे नमूद करत अमित शहा यांनी आश्चर्य व्यक्त केले. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पुन्हा एकदा या देशात तुष्टीकरणाच्या राजकारणाला बळ देत असल्याचा आरोप त्यांनी केला.

'वंदे मातरम्'चे विभाजन होऊ देण्याची मोठी चूक देशाने एकदा केली होती आणि त्याचे भीषण परिणाम आपण भोगले आहेत, त्यामुळे आता जनतेने एकत्र येऊन काँग्रेसच्या या निर्णयाविरोधात आवाज उठवावा, असे आवाहन त्यांनी केले. स्वातंत्र्याच्या ८० वर्षांनंतर आता देशात असे तुष्टीकरणाचे राजकारण चालणार नाही, असे सांगत भारतीय जनता पक्ष काँग्रेसच्या या भूमिकेचा तीव्र शब्दांत निषेध करत असून, रस्त्यापासून ते विधिमंडळ व संसदेपर्यंत या निर्णयाला जोरदार विरोध केला जाईल, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# रिंगरोडच्या पूर्व विस्तारिकरणाला मंजुरी

## १०,५०२ कोटींचा प्रकल्प मार्गी; २०२९ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पुणे रिंगरोडच्या पूर्व विस्तारिकरणाला राज्य सरकारकडून मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे १० हजार ५०२ कोटी रुपयांच्या सुधारित प्रकल्प खर्चास मंजुरी मिळाल्याने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पुढील कामांना वेग येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत (एमएसआरडीसी) हा प्रकल्प राबविण्यात येत असून, पुणे शहराबाहेरील वाहतूक वळवून शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे हा या रिंगरोडचा प्रमुख उद्देश आहे.**



पुणे-सोलापूर रस्त्यावरील सोरतापवाडी (वळती) ते पुणे-सातारा रस्त्यावरील वरवे (बु.) (शिरवे) या दरम्यानचा सुमारे ३९.६०५ किलोमीटर लांबीचा प्रवेश नियंत्रित द्रुतगती मार्ग या प्रकल्पाच्या पूर्व विस्तारिकरणात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे पुणे शहराच्या पूर्व आणि दक्षिण भागातील वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

पुणे शहरातून जाणाऱ्या आंतरराज्य तसेच राज्यांतर्गत वाहतुकीचा मोठा भार सध्या शहरातील प्रमुख रस्त्यांवर पडत आहे. या वाहतुकीला शहराबाहेरून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देऊन शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे हा रिंगरोडचा मुख्य उद्देश आहे. रिंगरोडमुळे पुणे शहरातून एका भागातून दुसऱ्या भागात जाणाऱ्या वाहनांना शहराच्या मध्यवर्ती भागातून जाण्याची आवश्यकता कमी होणार आहे. परिणामी शहरातील प्रमुख चौक, महामार्ग आणि अंतर्गत रस्त्यांवरील वाहनांची गर्दी कमी होण्यास मदत होईल. पुणे तसेच पिंपरी-चिंचवड परिसरातील वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

रिंगरोडच्या संबंधित प्रकल्पाची लांबी सुमारे २५.०३ किलोमीटर असून, २०३१ मध्ये दररोज सुमारे ४.४९ लाख प्रवासी या मार्गावरून प्रवास करतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि पुणे महानगर प्रदेशातील झपाट्याने होणारा औद्योगिक व निवासी विकास लक्षात घेता भविष्यात या मार्गाची वाहतूक क्षमता अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या रिंगरोडच्या माध्यमातून शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासोबतच पुणे शहराशी जोडलेल्या विविध महामार्गांवरील वाहतूक अधिक सुरळीत करण्याचे नियोजन आहे.

### १६८.८८१ किलोमीटरची सलग रिंगरोड

पुणे रिंगरोडची एकूण लांबी १६८.८८१ किलोमीटर असून, प्रकल्पाची सलगता सुनिश्चित झाल्यानंतर एकात्मिक प्रवेश नियंत्रित मार्गिका पूर्ण होणार आहे. या संपूर्ण प्रकल्पासाठी सुमारे ८० टक्के भूसंपादन पूर्ण झाले असून, प्रकल्पाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. प्रकल्पाचा मोठा भाग पूर्णत्वाच्या दिशेने गेल्यानंतर पुणे शहरातील तसेच पुणे महानगर प्रदेशातील वाहतुकीच्या स्वरूपात मोठा बदल होण्याची अपेक्षा आहे.

### दोन टप्प्यांत कामाला गती

रिंगरोड प्रकल्पासाठी भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर कामाच्या विविध टप्प्यांना गती देण्यात येणार आहे. प्रकल्प २०२९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यानुसार आवश्यक त्या प्रशासकीय, तांत्रिक आणि भूसंपादनाशी संबंधित बाबी पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे. रिंगरोडमुळे पुणे शहरातील वाहतूक केवळ एका दिशेने वळविण्याऐवजी शहराभोवती पर्यायी वाहतूक व्यवस्था निर्माण होणार आहे. त्यामुळे पुण्यात प्रवेश करणाऱ्या तसेच पुण्यातून बाहेर जाणाऱ्या वाहनांसाठी जलद आणि अधिक सुरक्षित पर्याय उपलब्ध होईल.

# राहुल गांधींच्या ‘छात्रों की गूंज’साठी पुणे पोलिसांच्या ३० अटी!

**महाईन्यूज । पुणे**

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या ‘छात्रों की गूंज’ कार्यक्रमाला परवानगी देताना पोलिसांनी ३० अटी घातल्या आहेत. वेळ, गर्दी, आक्षेपार्ह मजकूर याबाबत खबरदाऱ्या घेण्यास सांगण्यात आले आहे. दुसरीकडे, काँग्रेसने राहुल यांचा दौरा यशस्वी होण्यासाठी कंबर कसली असून, शनिवारच्या कार्यक्रमासाठी बुधवारपासूनच वातावरणनिर्मिती करण्यास सुरुवात केली.**



‘छात्रों की गूंज’ हा कार्यक्रम शनिवारी (२२ ऑगस्टला) पुणे आरटीओ कार्यालयाशेजारील ‘एसएसपीएमएस’च्या मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. त्याला परिमंडळ पाचच्या पोलीस उपआयुक्त राजलक्ष्मी शिवणकर यांनी काही अटी-शर्तींवर परवानगी दिली. पोलिसांनी याबाबतच्या नियमावलीचे पत्र काँग्रेसला दिले आहे. त्यानुसार, सायंकाळी साडेचार ते रात्री साडेनऊ या वेळात कार्यक्रमाला परवानगी आहे.

या कार्यक्रमासाठी ८ हजार ते १० हजारांचा जनसमुदाय अपस्थित राहील, असे गृहीत धरण्यात आले आहे. त्यामुळे, कार्यक्रमाच्या ठिकाणी मर्यादेपेक्षा अधिक नागरिकांना परवानगी देऊ नये, महिला आणि पुरुष यांच्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी, आत येण्यासाठी आणि बाहेर जाण्यासाठी किमान चार प्रवेशद्वारे असावीत, सर्व विभागांची ना हरकत प्रमाणपत्रे घ्यावीत आदी सूचना पोलिसांकडून करण्यात आल्या आहेत.

नियोजनासाठी स्वयंसेवकांचा जास्तीत जास्त वापर करावा, त्यामध्ये महिला स्वंयसेवकांची संख्या अधिक असावी, कार्यक्रमाच्या ठिकाणी गर्दी, गोंगाट होणार नाही, कायदा-सुव्यवस्थेची स्थिती निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी, कार्यक्रमाच्या परिसरात दिवस-रात्र चालणारे सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, आक्षेपार्ह मजकूर, धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत, याची काळजी घ्यावी, अशा विविध अटीही घालण्यात आल्या आहेत.

दरम्यान, शहर काँग्रेसने दिलेल्या माहितीनुसार, या कार्यक्रमासाठी राज्यातील विविध जिल्ह्यांतून महिला आणि विद्यार्थिनी येणार आहेत. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने तरुणी कशा पद्धतीने उपस्थित राहतील, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. राहुल त्यांच्याशी संवाद साधणार असून, त्यांचे प्रश्न जाणून घेऊन त्यांच्याशी चर्चा करणार आहेत.

### शहरभरात वातावरणनिर्मिती

पक्षाचे प्रदेश पातळीवरील नेते पुणे शहरात ठाण मांडून बसले असून, विविध समाज माध्यमांद्वारे या कार्यक्रमाची जाहिरात केली जात आहे. शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर, चौकांमध्ये कार्यक्रमाचे जाहिरात फलक, फ्लेक्स लावून वातावरणनिर्मिती केली जात आहे. काँग्रेसने या कार्यक्रमासाठी टी-शर्ट तयार केले असून, त्याचे अनावरण बुधवारी करण्यात आले.

# पुनावळेत कचरा डेपो नव्हे; ऑक्सिजन पार्कच होणार!

## पिंपरी-चिंचवड महापालिकेची ४ कोटी १५ लाखांची निविदा प्रक्रिया

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पुनावळेच्या भवितव्याबाबत सुरू असलेल्या चर्चेला आता ठोस उत्तर मिळाले आहे. पुनावळेत कचरा डेपो नव्हे, तर ऑक्सिजन पार्कच होणार! पुनावळे येथील स. नं. २३, २४ पैकी तब्बल २२.२० हेक्टर जागेवर इको टुरिझम ऑक्सिजन पार्क विकसित करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने अखेर निविदा प्रक्रिया सुरू केली आहे.**

या प्रकल्पासाठी महापालिकेने ४ कोटी १५ लाख २८ हजार ३२ रुपये इतक्या रकमेची निविदा काढली असून, काम पूर्ण करण्यासाठी २४ महिन्यांची मुदत निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे पुनावळेतील संबंधित जागेबाबत सुरू असलेल्या विविध चर्चांना पूर्णविराम मिळाला असून, या ठिकाणी हरित आणि पर्यावरणपूरक प्रकल्प साकारण्याच्या दिशेने महापालिकेने अधिकृत पाऊल टाकले आहे.

पुनावळे परिसराचा झपाट्याने विकास होत असताना या भागातील मोकळ्या जागांचा वापर कशासाठी होणार, याबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता आणि चर्चा होती. विशेषतः कचरा व्यवस्थापनासाठी या परिसराचा वापर होण्याच्या शक्यतेबाबतही चर्चा रंगली होती. मात्र, आता महापालिकेच्या अधिकृत निविदा प्रक्रियेमुळे या जागेचा विकास ऑक्सिजन पार्कच्या माध्यमातून करण्याचे स्पष्ट झाले आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या प्रकल्पामुळे पुनावळेला मोठे हरित क्षेत्र मिळणार आहे. त्यामुळे 'कचरा डेपो नको, ऑक्सिजन पार्क हवा' या अपेक्षेला प्रत्यक्ष विकासकामाची जोड मिळाली आहे.

महापालिकेच्या निविदेनुसार या कामाची एकूण निविदा रक्कम ४ कोटी १५ लाख २८ हजार ३२ रुपये आहे. निविदा प्रक्रिया १९ ऑगस्टपासून सुरू झाली असून, २६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत निविदा स्वीकारल्या जाणार आहेत. निविदापूर्व सभा २१ ऑगस्ट रोजी होणार असून, कामाची मुदत २४ महिने आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.




### आमदार शंकर जगताप यांचा पुढाकारावा...

पुनावळेच्या विकासासोबत पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य देण्याच्या भूमिकेतून आमदार शंकरभाऊ जगताप यांनी ऑक्सिजन पार्कच्या संकल्पनेला पुढाकार दिला. पुनावळेकरांना मोठे हरित क्षेत्र उपलब्ध व्हावे, या उद्देशाने या प्रकल्पाचा पाठपुरावा करण्यात आला. त्यामुळे निविदा प्रक्रिया सुरू होणे हा प्रकल्प प्रत्यक्षात येण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. ऑक्सिजन पार्कसाठी प्रभागातील लोकप्रतिनिधींनीही सातत्याने पाठपुरावा केला. नगरसेविका रेश्मा भुजबळ, नगरसेविका श्रुती वाकडकर, नगरसेवक कुणाल ओव्हाळकर आणि नगरसेवक राहुल कलाटे यांनी पुनावळेकरांच्या मागण्या प्रशासनापर्यंत पोहोचवून प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले.

"पुनावळेचा झपाट्याने विकास होत असताना पर्यावरणाचे संवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे. ऑक्सिजन पार्कमुळे पुनावळेला मोठे हरित क्षेत्र मिळणार असून, नागरिकांना शुद्ध हवा आणि मोकळी जागा उपलब्ध होईल. कचरा डेपोऐवजी पर्यावरणपूरक प्रकल्प उभा राहत असल्याने ही पुनावळेकरांसाठी निश्चितच आनंदाची बाब आहे."
- रेश्मा भुजबळ, नगरसेविका

"पुनावळेकरांची ऑक्सिजन पार्कची मागणी होती. आता त्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू झाल्याने नागरिकांच्या अपेक्षेला मूर्त स्वरूप मिळत आहे. मुलांसाठी खेळाचे क्षेत्र, नेचर ट्रेल आणि लँडस्केपिंगसारख्या सुविधांमुळे हा पार्क सर्वांसाठी उपयुक्त ठरेल. विकासासोबत हिरवाई जपणे ही आमची भूमिका आहे."
- श्रुती वाकडकर, नगरसेविका

"पुनावळेच्या भविष्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. वाढत्या नागरीकरणाच्या काळात नागरिकांना मोठ्या प्रमाणात हरित क्षेत्र देणे गरजेचे आहे. पुनावळेत कचरा डेपोची नव्हे, तर हिरवाईची आणि चांगल्या पर्यावरणाची ओळख निर्माण व्हावी, ही आमची भूमिका आहे. निविदा प्रक्रिया सुरू झाल्याने या दिशेने ठोस पाऊल पडले आहे."
- कुणाल वाव्हळकर, नगरसेवक

"पुनावळेकरांना दिलेला शब्द पूर्ण करण्याच्या दिशेने आज महत्त्वाचे पाऊल पडले आहे. ऑक्सिजन पार्कसाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला आता प्रशासकीय स्वरूप मिळाले असून, महापालिकेने ४ कोटी १५ लाख रुपयांची निविदा काढली आहे. आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या पुढाकारातून हा प्रकल्प प्रत्यक्षात येत आहे. पुनावळेत कचरा डेपो नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठी ऑक्सिजन पार्कची हरित संपत्ती उभी राहणार आहे."
- राहुल कलाटे, नगरसेवक

---

# कचऱ्याच्या प्रश्नावर भाजपा नगरसेवकांनी स्थायी समितीत प्रशासनाला घेरले!

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**शहरातील वाढत्या कचरा प्रश्नावरून महापालिकेच्या स्थायी समिती बैठकीत भोसरी विधानसभा मतदारसंघातील नगरसेवकांनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. ८ जुलै रोजी मोशी कचरा डेपो येथे झालेल्या दुर्घटनेत नऊ कर्मचारी बांधवांचा मृत्यू झाला. या घटनेला सुमारे ४० दिवस उलटूनही कचरा व्यवस्थापनात ठोस बदल का झाला नाही, असा सवाल सदस्यांनी उपस्थित केला.**



नगरसेविका सारिका गायकवाड यांनी मोशी येथील प्रक्रिया प्रकल्प बंद असतानाही दररोज सुमारे १,४०० ते १,५०० टन कचरा मोशी डेपोमध्ये डम्पिंग होत असल्याचा मुद्दा मांडला. तर नगरसेविका अर्चना करांडे यांनी गेल्या ४० दिवसांत अंदाजे ५६ ते ६० हजार टन अतिरिक्त कचरा जमा झाल्याचे सांगत, या काळात प्रशासनाने नेमक्या कोणत्या उपाययोजना केल्या, असा थेट जाब विचारला.

योगिता नागरगोजे आणि कृष्णा सुरकुले यांनीही शहर विकासासाठी कोट्यवधी रुपयांची कामे मंजूर होत असताना नागरिकांच्या आरोग्याशी निगडित कचरा प्रश्नाकडे दुर्लक्ष का, असा सवाल केला. शीतल वर्णेकर यांनीही कचरा व्यवस्थापनाबाबत ठोस नियोजनाची मागणी केली.

या बैठकीत छत्रपती संभाजी महाराजांच्या 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' संदर्भातील वाढीव आर्थिक तरतुदीच्या विषयावरही भोसरी विधानसभा मतदारसंघातील सदस्यांनी ठाम भूमिका मांडली.

### सर्वसाधारण सभेत होणार खडाजंगी..?

कचरा प्रक्रिया केंद्रे, 'लीगेसी वेस्ट', पर्यायी व्यवस्था आणि संबंधित कंपन्यांवरील कारवाई या मुद्द्यांवर सत्ताधारी आणि विरोधकांच्या भूमिका वेगवेगळ्या असल्याने आगामी सर्वसाधारण सभेत कचरा प्रश्नावर पुन्हा जोरदार खडाजंगी होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे यांनी मोशी डेपोमध्ये काम करणाऱ्या इतर कंपन्यांवरही दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर कारवाईची मागणी केली. त्यावर भाजप नगरसेवकांनी त्यांच्या प्रभागातील कचरा प्रश्नावर त्यांनी आतापर्यंत काय भूमिका घेतली, असा प्रतिप्रश्न केला.

### आयुक्त भूमिका स्पष्ट करणार...

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि प्रमुख अधिकारी बैठकीला अनुपस्थित होते. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी शहरातील दहा क्षेत्रीय प्रभागांमध्ये कचरा संकलन केंद्रांसाठी जागा शोधण्यात आल्याची माहिती दिली. या विषयावर आयुक्त आगामी सर्वसाधारण सभेत सविस्तर माहिती देतील, असे आश्वासन देण्यात आले.



## भूमिका

**अर्थसंकल्पातील कोट्यवधी रुपयांच्या निधीचा योग्य विनियोग होतो आहे की नाही, याची पाहणी करण्यासाठी विधिमंडळाची अंदाज समिती महत्त्वाची भूमिका बजावते. शासनाच्या योजनांमध्ये काटकसर, कार्यक्षमता आणि पारदर्शकता राहावी, हा या समितीच्या स्थापनेमागचा मूलभूत उद्देश आहे.**

# अंदाज समितीला पारदर्शकतेचा 'कृती अहवाल' कधी?



त्यामुळे समितीच्या दौऱ्याला प्रशासनात एकेकाळी आदरयुक्त भीती होती. मात्र, अलीकडच्या काळातील काही घटनांमुळे या संस्थेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. मे २०२५ मध्ये धुळे येथील शासकीय विश्रामगृहात समितीच्या मुक्कामादरम्यान तब्बल १ कोटी ८४ लाख रुपयांची रोकड आढळल्याच्या घटनेने मोठी खळबळ उडाली होती. त्यानंतरही समितीच्या कार्यपद्धतीत अपेक्षित सुधारणा झाल्याचे दिसत नाही.

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात अहिल्यानगर जिल्ह्यात झालेल्या समितीच्या दौऱ्याभोवतीही आर्थिक व्यवहारांच्या चर्चेने गंभीर प्रश्न उपस्थित केले. समितीतील अनेक सदस्य दौऱ्याला अनुपस्थित राहिले, तर काही सदस्य शेवटच्या दिवशी दाखल झाल्याचे सांगितले जाते. अशा परिस्थितीत समितीच्या दौऱ्याचा उद्देशच कितपत साध्य होतो, हा प्रश्न आहे. समितीचा अर्थ अधिकाऱ्यांची झाडाझडती घेणे किंवा विशिष्ट अधिकाऱ्यांवर दबाव निर्माण करणे असा अजिबात नाही. निधीचा वापर नियमानुसार झाला आहे का, कामांची आवश्यकता आणि उपयोगिता काय आहे, खर्चात काटकसर झाली का, याचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणे हे तिचे प्रमुख काम आहे. मात्र, समितीच्या दौऱ्याच्या नावाखाली शाही आदरातिथ्य, महागड्या गाड्या, आलिशान निवास आणि भोजनाची अपेक्षा निर्माण होत असेल, तर हा प्रकार लोकशाहीच्या आर्थिक शिस्तीलाच हरताळ फासणारा ठरतो.

याहून गंभीर बाब म्हणजे समितीच्या संभाव्य दबावापासून वाचण्यासाठी काही अधिकारी किंवा कर्मचारी वर्गणी गोळा करत असतील, तर हा प्रकार केवळ प्रशासकीय गैरप्रकार नसून व्यवस्थेतील भीतीचे लक्षण आहे. चौकशी करणारी संस्था जरच दबावाचे माध्यम बनत असेल, तर तिच्या अस्तित्वाचा मूळ हेतूच हरवतो. समितीच्या अधिकारांचा वापर वैयक्तिक प्रभाव, आर्थिक अपेक्षा किंवा प्रतिष्ठेसाठी होऊ नये.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. अंदाज समितीच्या प्रत्येक दौऱ्याचा खर्च, सदस्यांची उपस्थिती, झालेल्या बैठका आणि पाहणी केलेली कामे यांची पारदर्शक नोंद सार्वजनिक झाली पाहिजे. त्याचबरोबर समितीच्या शिफारशींपैकी किती स्वीकारल्या, किती नाकारल्या आणि किती प्रलंबित आहेत, याचा कृती अहवाल नियमितपणे प्रसिद्ध झाला पाहिजे.

अंदाज समिती ही निधीचा 'मलिदा' लाटण्यासाठी नव्हे, तर जनतेच्या पैशाचा योग्य हिशेब घेण्यासाठी आहे. तिची प्रतिष्ठा टिकवायची असेल, तर अधिकारासोबत उत्तरदायित्व आणि पारदर्शकताही अनिवार्य केली पाहिजे. अन्यथा जनतेच्या पैशावर देखरेख करणारी समितीच संशयाच्या भोवऱ्यात सापडेल.

## प्रासंगिक »

### जागृतीची किंमत

**एका गावात गणेश नावाचा तरुण राहत होता. तो नेहमी म्हणायचा, "आपल्या गावात काहीही बदलणार नाही." निवडणुकीच्या वेळी मात्र तो मतदानाबद्दल मोठमोठ्या गप्पा मारायचा. एकदा मतदानाची तारीख जवळ आली.**

मित्रांनी मतदारयादी तपासण्यास सांगितले, पण गणेशने ते टाळले. मतदानाच्या दिवशी तो उत्साहाने केंद्रावर गेला. रांगेत बराच वेळ उभा राहिल्यानंतर त्याला कळले की मतदारयादीत त्याचे नावच नव्हते. गणेश संतापला; त्याने प्रशासनाला दोष दिला. तेव्हा एका अधिकाऱ्याने शांतपणे सांगितले, "मतदारयादी प्रसिद्ध झाल्यानंतर तपासणी आणि दुरुस्तीची संधी दिली होती. तुम्ही तेव्हा जागरूक राहिला असता, तर आज ही वेळ आली नसती."

गणेशला आपली चूक समजली. पुढच्या निवडणुकीपूर्वी त्याने स्वतःचे नाव तपासलेच, शिवाय गावातील इतर नागरिकांनाही मतदारयादी तपासण्यास प्रवृत्त केले. त्याच्या प्रयत्नांमुळे अनेकांची नावे वेळेत दुरुस्त झाली.


- तात्पर्य : **हक्क मिळाल्यानंतर त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारीही आपलीच असते.**

मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची (SIR) प्रक्रिया महाराष्ट्रात नुकतीच पहिल्या टप्प्यात पूर्ण झाली. राज्यातील सुमारे ९ कोटी ७८ लाख मतदारांपैकी ७ कोटी ७१ लाख मतदारांनी गणना प्रपत्र भरून दिले.

# मतदारयादीकडे दुर्लक्ष नको; लोकशाहीचा हक्क जपा!

मात्र, तब्बल २ कोटी ७ लाख मतदार 'एएसडीडीओ' श्रेणीत गेले आहेत. याचा अर्थ त्यांची नावे कायमची मतदारयादीतून वगळली गेली, असा अजिबात नाही. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर हरकती, दुरुस्ती आणि आवश्यक कागदपत्रांच्या आधारे नाव पुन्हा समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध आहे.

तरीही या आकडेवारीने एक गंभीर वास्तव समोर आणले आहे. विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये मतदारांच्या नोंदी अपूर्ण राहण्याचे प्रमाण मोठे आहे. शहरी मतदारांची स्थलांतराची प्रवृत्ती, बदललेले पत्ते, कामानिमित्त सतत होणारी ये-जा आणि मतदारयादीकडे असलेले दुर्लक्ष यामुळे ही समस्या अधिक तीव्र होते. मतदानाच्या वेळी लोकशाहीबद्दल मोठमोठ्या चर्चा करणाऱ्या नागरिकांनी प्रत्यक्ष मतदारयादीत आपले नाव आहे की नाही, हे तपासण्याची साधी जबाबदारीही पार पाडू नये, ही चिंतेची बाब आहे.



मात्र, संपूर्ण दोष मतदारांवर टाकणेही योग्य ठरणार नाही. बूथ लेव्हल ऑफिसर अर्थात बीएलओंवर मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची महत्त्वाची जबाबदारी आहे. प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहितीची खातरजमा करण्याऐवजी केवळ औपचारिकता पूर्ण केली जात असेल, तर पुनरीक्षणाच्या संपूर्ण उद्देशालाच धक्का बसतो. अशा हलगर्जीपणावर प्रशासनाने कठोर कारवाई करणे आवश्यक आहे.

राजकीय पक्षांचे बीएलए आणि स्वयंसेवक प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यास मदत करू शकतात; मात्र अंतिम जबाबदारी प्रशासनाची आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मतदाराची आहे. मतदानाचा अधिकार हा लोकशाहीतील अत्यंत मूलभूत अधिकार आहे. तो केवळ निवडणुकीच्या दिवशी मतदानकेंद्रावर जाऊन मिळत नाही; त्यासाठी मतदारयादीतील आपली नोंद अचूक आहे, याची खात्री करणेही आवश्यक आहे.

३१ ऑगस्टला प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर उपलब्ध असलेल्या कालावधीत प्रत्येक नागरिकाने आपले नाव, पत्ता आणि इतर तपशील तपासून घ्यावेत. नाव नसेल किंवा माहिती चुकीची असेल, तर वेळेत हरकत नोंदवून दुरुस्ती करून घ्यावी.

निवडणुकीच्या दिवशी नाव नाही म्हणून संताप व्यक्त करण्यापेक्षा आजच जागे होणे शहाणपणाचे आहे. लोकशाही केवळ सरकारची किंवा निवडणूक आयोगाची जबाबदारी नाही; ती प्रत्येक मतदाराचीही आहे. मतदारयादी तपासा, हक्क जपा आणि मतदानासाठी सज्ज व्हा— कारण लोकशाहीत उदासीनतेची किंमत मोठी असते.

## ।। अभंगवाणी ।।



दुर्जनासि करी साहे ।<br>
तो ही दंड हे लाहे ॥१॥

शिंदळीच्या कुंटणी वाटा ।<br>
संग खोटा खोट्याचा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तुकाराम मुंढेंचा मोर्चा आता खाद्यतेलाकडे

## सुटे तेल विकण्यास बंदी, विक्रेत्यांना दिला मोठा इशारा

**महाईन्यूज । मुंबई**

**गेल्या काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासन विभागाच्यावतीने राज्यभरात भेसळखोरांच्या विरोधात धडक कारवाई करण्यात येत आहे. भेसळयुक्त खाद्यपदार्थांविरोधात तुकाराम मुंढे यांनी कारवायांचा धडाका लावला आहे. मुंढे यांच्या या धडाकेबाज कामाची सध्या राज्यात मोठी चर्चा सुरू आहे.**





भेसळयुक्त पनीर, भेसळयुक्त दूध, रेस्टॉरंट्स, हॉटेलवरील निकृष्ट दर्जाचं जेवण, शाळांमधील खाणावळी यानंतर आता तुकाराम मुंढे यांनी आपला मोर्चा खाद्यतेलाकडे वळवला आहे. तुकाराम मुंढे यांनी आज (२० ऑगस्ट) पत्रकार परिषद घेत खाद्यतेल विक्रीबाबत महत्वाचे निर्देश जारी केले आहेत. यापुढे आता सुटे खाद्यतेल विकण्यास बंदी असणार आहे. तसेच खाद्यतेलाबाबत एफडीएच्या नियमांची यादी तुकाराम मुंढे यांनी सांगितली आहे.

“‘सेफ फूड, सेफ महाराष्ट्र’ या अंतर्गत आपण काम करत आहोत, आता आपण काही कंप्लायंस ऑर्डर काढत आहोत. आधी आपण हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मिल्क प्रोडक्टबाबत ऑर्डर काढली होती. राज्यातील शाळांच्या बाबतीत देखील कंप्लायंस ऑर्डर काढली होती. या सर्वांची अंमलबजावणी सुरू आहे. आता ‘सेफ फूड, सेफ महाराष्ट्र’ या मोहिमेच्या पुढचा एक महत्वाचा टप्पा आहे. याबाबतीत पुढील कंप्लायंस ऑर्डर आपण आजपासून जारी करत आहोत. ही एडीबल ऑईलच्या (खाद्यतेल) संदर्भातील आहे”, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

“खाद्यतेल हे सर्व नागरिकांच्या घरात असतं. हे खाद्यतेल आपल्याला वेगवेगळे पदार्थ बनवण्यासाठी लागतं. २०११ च्या कायद्यानुसार, लायसन्स असणं किंवा रजिस्टेशन्स असणं आणि फूड प्रॉडक्टच्या बाबतीत जे नियम आहेत ते पाळणं आणि त्यानुसार खाद्यतेलाच प्रोडक्शन होणं आणि विक्री करणं गरजेचं आहे”, असं तुकाराम मुंढे यांनी म्हटलं आहे.

“गेल्या काही काळात आम्ही काही तपासण्या केल्या असता आम्हाला काही गंभीर मुद्दे आढळून आले आहेत. त्यामुळे यामध्ये जास्त काम करण्याची गरज असल्याचं आमच्या निदर्शनास आलं. खाद्यतेलाची जी इंडस्ट्री आहे. त्यामध्ये पॅकेजिंग असेल किंवा लेबल किंवा ब्रँडवर काम करणाऱ्या आस्थापना. या सर्वांबाबत आमच्या ८ ते १० गोष्टी निदर्शनास आल्या आहेत आणि यामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत”, असं तुकाराम मुंढे यांनी सांगितलं आहे.

“पहिली गोष्ट म्हणजे लायसन्स नसणारे अनेकजण आहेत. त्यांच्याकडे लायसन्स नाही, पण ते या क्षेत्रात काम करत आहेत. मात्र, यासाठी लायसन्स बंधनकारक आहे. ज्यांच्याकडे लायसन्स नसेल त्यांच्यावर कारवाई होईल”, असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला.

“दुसरं म्हणजे जे खाद्यतेल आहे, त्यामध्ये भेसळ केल्याचे प्रकार आम्हाला आढळून आलेत. मोहरी तेल जे आहे, त्याचंही अनधिकृत मिश्रण करण्याचे प्रकार आढळून आले आहेत. फक्त मोहरीचं तेल विकता येतं, पण मोहरीचं तेल मिश्रण करून विकता येत नाही”, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी सांगितली.

“तसेच तेलाचा खरा स्रोत आणि तारीख व लेबलिंग हे लपवल्याचं निदर्शनास आलं आहे. मुदत संपलेलं तेल पुन्हा विकल्याच्या काही बाबी लक्षात आल्या आहेत.

### सुटे तेल विकण्यास बंदी

“सुटे खाद्यतेल विकता येत नाही. किरकोळ खाद्यतेल विक्रेत्यांनी आता सुटे तेल खरेदी करू नये. तसेच भेसळयुक्त तेल विकल्यास ७ वर्षांची शिक्षा होऊ शकते आणि १० लाखांचा दंड होऊ शकतो”, असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

खाद्यतेल सुटे विकले जाते असेही आमच्या निदर्शनास आले आहे. तसेच वारलेल्या किंवा गंजलेल्या किंवा अयोग्य असलेल्या डब्यात तेल भरून त्याची विक्री केली जाते असंही निदर्शनास आलं. अशा अनेक गोष्टी आढळून आलेल्या आहेत. मात्र, आता अशा गोष्टी आढळल्यास कारवाई होईल”, असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला.

“तसेच अन्नसंपर्क सामग्री म्हणून घातक प्लास्टिक पॅकिंगचा वापर केला जात आहे. तसेच टँकर्सद्वारे अन्नसुरक्षेच्या नियमांचं उल्लघन करत अयोग्य पद्धतीने खाद्यतेलाची वाहतूक देखील केली जात असल्याचं निदर्शनास आलं. या बरोबरच किरकोळ विक्रेत्याने खाद्यतेल विना-सील किंवा त्याबाबतीत छेडछाड केलेलं तेल विकत घेऊ नये, असं आढळून आल्यास कारवाई होऊ शकते”, असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला.

# “मुंबईचे भूखंड मित्रांना विकतायेत”; आदित्य ठाकरेंची मुख्यमंत्र्यांवर टीका

**महाईन्यूज । मुंबई**

**शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी आज (२० ऑगस्ट) पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. मुंबईतील मोकळ्या जागांवर भाजपाचा डोळा असून मोकळ्या जागा खासगी विकासकांना देण्याचा घाट भाजपाने घातला आहे. १५ दिवसांत भूखंड देण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी महापालिकेला दिले आहेत. हा घोटाळा थांबला पाहिजे, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली आहे.**



मुंबईतील एक मैदान आणि आणखी दोन प्लॉट्स अशा तीन ठिकाणच्या या मोकळ्या जागा ताब्यात घेऊन भाजपाचा खासगीकरणाचा डाव आहे. मात्र, आम्ही याला विरोध करणार असून याविरोधात रविवारी आंदोलन करणार आहोत, अशी माहिती आदित्य ठाकरे यांनी दिली आहे.

“मुंबईतील एक मैदान आणि आणखी दोन प्लॉट्स हे मुख्यमंत्री फडणवीस एका भाजपाच्या आमदाराला गिफ्ट करत आहेत. या प्लॉट्सची किंमत १० वर्षांपूर्वी साडेपाचशे कोटी होती. आज याची किंमत किती असेल? पण असं असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी एका भाजपा आमदाराला हे प्लॉट्स २१ लाख रुपये प्रतिवर्ष या किंमतीवर देण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईतील एकूण तीन भूखंड हे मुख्यमंत्र्यांच्या एका मित्राला म्हणजे एका खासगी संस्थेला देत आहे”, असे आरोप आदित्य ठाकरे यांनी केले आहेत.

“मुंबईतील २२ बस डेपो असतील किंवा भूखंड हे मुख्यमंत्री फडणवीस स्वत:च्या मित्रांना देत असतील तर हा घोटाळा उघड दिसत आहे. पंतप्रधान मोदींचं या भ्रष्टाचाराकडे लक्ष आहे का? आम्ही याबाबत न्यायालयात गेलो आहोत, आता न्यायालयाचा निर्णय अपेक्षित आहे. आमचंही याकडे लक्ष आहे. मात्र, तुम्ही एवढी घाईगडबड कशासाठी करत आहात? माझ्याकडे अशी माहिती आली आहे की मुख्यमंत्र्यांनी महापालिकेला आदेश दिलेत की पुढच्या १५ दिवसांत या सगळ्या भूखंडांचा श्रीखंड खाण्यास त्यांना मोकळीक द्यावी”, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली.

“मुंबईतील मोकळ्या जागा ताब्यात घेऊन खासगीकरणाचा भाजपाचा डाव आहे. मात्र मुंबईकर म्हणून आम्ही विरोध करणार आहोत. रविवारी संध्याकाळी ५ वाजता तिरंगा हाती घेऊन आम्ही या विरोधात आंदोलन करणार आहोत. मोकळ्या जागा वाचवण्यासाठी नागरिकांनी आंदोलनात सहभागी व्हावं, अशा मोकळ्या जागा मिळवण्यासाठी भाजपाला बीएमसी ताब्यात पाहिजे होती का? हा भूखंडचा घोटाळा थांबला पाहिजे. मुंबईसाठी सर्वांनी एकत्र यायला पाहिजे. आमचा काही पक्षांबरोबर संवाद झाला असून कॉँग्रेस आणि मनसे सोबत येण्यास तयार आहे”, असंही आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे.

“भूखंडांमध्ये भ्रष्टाचार होईल हे आम्हाला फडणवीस यांच्याकडून अपेक्षित नव्हतं. खरं तर हा मोठा धक्का आहे. देवेंद्र फडणवीस हे भाजपाच्या आमदारांना भूखंड वाटत आहेत? मी सध्या संबंधित आमदारांचं किंवा एखाद्या संस्थेचं नाव घेत नाही, कारण माझं भांडण त्यांच्याशी नाही. माझं भांडण या प्रक्रियेशी आणि भ्रष्टाचाराशी आहे. माझं वैयक्तिक भांडण कोणाशीही नाही”, असंही आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# ट्रम्प यांचा आख्ख्या जगाला इशारा

## जो कुणी देश इराणला मदत करेल, त्याला भयंकर परिणाम भोगावे लागतील!

**महाईन्यूज** । अमेरिका

**गेल्या काही महिन्यांपासून अमेरिका-इराणमध्ये संघर्ष सुरू आहे. हा संघर्ष दिवसेंदिवस आणखी वाढत असल्याचं दिसून येत आहे. अमेरिका-इराणमध्ये शस्त्रसंधी झाली होती. मात्र, त्यानंतर अचानक ही शस्त्रसंधी संपुष्टात आल्याची घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आणि त्यानंतर दोन्ही देशातील तणाव वाढला. अमेरिका-इराणमधील 'इस्लामाबाद सामंजस्य करार' देखील मोडल्याची चर्चा आहे. त्यामुळे आता अमेरिका-इराण संघर्ष कधी संपेल? हा प्रश्न कायम आहे.**



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे इराणला धमकीवजा थेट युद्धाचा इशारा देणारे वक्तव्य करत असल्यामुळे तणावात भर पडत असल्याचं बोललं जात आहे. या अमेरिका-इराण युद्धाचा फटका जागतिक व्यापाराला बसत असल्यामुळे जगातील अनेक देशांवर याचे गंभीर परिणाम होत आहेत. अशा परिस्थितीत देखील डोनाल्ड ट्रम्प हे आक्रमक भूमिका घेत असल्याचं दिसून येत आहे.

इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर बोलताना डोनाल्ड ट्रम्प यांनी आता आख्ख्या जगालाच मोठा इशारा दिला आहे. 'जो कुणी देश इराणला मदत करेल, त्याला भयंकर परिणाम भोगावे लागतील', असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. या संदर्भात ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ सोशलवर पोस्ट शेअर करत सविस्तर भाष्य केलं आहे. मात्र, ट्रम्प यांच्या या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

इराणविरुद्ध आतापर्यंतची सर्वात कठोर आर्थिक कारवाई करण्याचा इशारा ट्रम्प यांनी दिला. तसेच जो कोणता देश इराणशी व्यापार करेल, त्या देशाला भयंकर आर्थिक परिणामांना सामोरं जावं लागू शकतं, असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

"आज मी जाहीर करतो की, जो कोणताही देश आपल्या वित्तीय संस्था, व्यवसाय, विमानतळ किंवा सरकारी संस्था इराणला कोणत्याही प्रकारची मदत करत असेल, तर त्या देशाला मोठ्या आर्थिक परिणामांना सामोरं जावं लागेल", असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे.

"इराणला एकाकी पाडण्यासाठी व त्यांचा पराभव करण्यासाठी आम्हाला आमच्या सर्व मित्रराष्ट्रांनी अमेरिकेच्या पाठीशी उभं राहण्याची गरज आहे. इराण आता पराभवाच्या छायेत आहे. आता हेच ऐतिहासिक उपाय इराणला जगभरात दहशत पसरवण्याच्या त्यांच्या क्षमतेला पूर्णपणे निकामी करतील. इराणकडे कधीही अणुशस्त्र असणार नाही", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केलं आहे.

### "इराणने ती संधी गमावली'

"इराणला करार करण्याची एवढी चांगली आणि मोठी संधी इतर कोणीही दिली नसती. मात्र, इराणला या संधीचा फायदा करता आला नाही. दुर्दैवाने त्यांनी ती संधी गमावली. त्यामुळे मी आता कोणत्याही देशाविरुद्ध आतापर्यंत करण्यात आलेल्या सर्वात कठोर आर्थिक कारवाईची घोषणा करत आहे. इराणचं नौदल संपुष्टात आलंय, वायुदल नष्ट झालं आहे, अनेक कारखाने ढिगाऱ्यात बदलले आहेत, त्यांच्या चलनाचं मूल्य शून्य झालं आहे, त्यांचा देश अत्यंत नाजूक स्थितीत आहे", असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

# दारू बंदी असलेल्या गुजरातमध्ये बनावट दारू प्यायल्याने ६ जणांचा मृत्यू

**महाईन्यूज** । गुजरात

**बनावट दारू पिल्यानंतर ६ जणांचा बळी गेल्याची धक्कादायक घटना गुजरातमध्ये घडली आहे. विशेष म्हणजे गुजरातमध्ये दारू बंदी आहे. मात्र, तरी देखील एका पार्टीत भेसळयुक्त दारू प्यायल्याने ६ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे गुजरातमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेची पोलिसांकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे.**



गुजरातमधील भावनगर जिल्ह्यात रॉयल स्टॅगच्या बाटल्यांमध्ये भेसळयुक्त दारू भरली होती आणि या दारूचा समावेश एका पोलीस कर्मचाऱ्याने आयोजित केलेल्या पार्टीत करण्यात आला होता. पार्टी दरम्यान ही भेसळयुक्त दारू पिल्यानंतर अनेकांची प्रकृती अचानक बिघडली. यामध्येच ६ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच २५ जणांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

मंगळवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास भावनगरमधील एका हॉस्पिटलमध्ये २५ वर्षीय उपेंद्रसिंह यांचा मृत्यू झाल्यानंतर ही घटना उघडकीस आली आहे. उपेंद्रसिंह हे रविवारी रात्री त्यांचे मित्र हरपालसिंह गोहिल आणि विश्वराजसिंह गोहिल यांच्याबरोबर एका पार्टीत सहभागी झाले होते. ही पार्टी विश्वराजसिंह यांची पोलीस दलात निवड झाल्याचा आनंद साजरा करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती.

याच पार्टीत काही जणांनी बनावट दारूचं सेवन केलं होतं. दरम्यान, विश्वराजसिंह यांची प्रकृती सध्या गंभीर असून ते भावनगरमधील एका हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत. या घटनेत बाधित झालेले लोक भावनगर जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागांमधील आहेत. ही दारू एकाच अवैध दारू विक्रेत्यांच्या साखळीच्या मार्फत मिळाली असावी असा संशय पोलिसांना आहे. या घटनेत बाधित झालेल्या अनेक रुग्णांना श्वास घेण्यास त्रास होत आहे. तसेच काहींना दृष्टी जाणं या सारखी लक्षणे जाणवत आहेत. तसेच मूत्रपिंडाशी संबंधित देखील त्रास जाणवत असल्याची माहिती सांगितली जात आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांनी काय म्हटलं?

भावनगरचे जिल्हाधिकारी मनीष कुमार बन्सल यांनी या घटनेसंदर्भात बोलताना म्हटलं की, "जिल्हा प्रशासनाला मंगळवारी सायंकाळी ६ वाजता या घटनेची माहिती मिळाली होती. त्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात बाधित व्यक्तींची ओळख पटवण्यात येत आहे. मृत्यू झालेल्या दोन व्यक्तींची ओळख ४० वर्षीय कार्तिक आणि ५० वर्षीय घनश्यामसिंह अशी पटली आहे."

### स्टेट मॉनिटरिंग सेलकडून तपास सुरू

दरम्यान, पोलीस अधीक्षक मयूर चावडा यांनी या घटनेची माहिती देताना सांगितलं की, "पोलिसांनी तपासाची सूत्रे हाती घेतली आहेत. ही दारू भावनगरमध्येच तयार करून विकली गेली होती. या प्रकरणात काही संशयितांना ताब्यात घेण्यात आलं आहे आणि पुढील कारवाई सुरू आहे."



# जान्हवीचा नवा सिनेमा!

जान्हवी कपूर ही ‘पेद्दी’च्या वादातून सावरली असल्याचे मानले जात आहे. अभिनेत्रीने दिग्दर्शक उमेश बिष्ट यांच्या चित्रपटाची ऑफर स्वीकारली आहे. जान्हवीच्या नव्या चित्रपटाचे नाव अद्याप ठरलेले नाही. हा चित्रपट एकता कपूर यांचे बालाजी मोशन पिक्चर्स आणि गुनीत मोंगा यांच्या सिख्या एंटरटेनमेंटकडून निर्माण केला जाणार आहे.  या चित्रपटाचे चित्रिकरण ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या आसपास सुरू होणार आहे. कहाणी अन् उर्वरित कलाकारांसंबंधी अधिक माहिती अद्याप समोर आलेली नाही. उमेश बिष्ट सध्या ‘पगलैट 2’च्या दिग्दर्शनात व्यग्र आहेत. हा चित्रपट 2021 मध्ये प्रदर्शित नेटफ्लिक्स चित्रपटाचा सीक्वेल असणार आहे. सान्या मल्होत्रा यात संध्याच्या रुपात स्वत:ची मुख्य भूमिका साकारणार आहे.  पेद्दी चित्रपटातील जान्हवीच्या भूमिकेमुळे चित्रपटांमध्ऽय महिलाहंच्या सादरीकरणावरून एक चर्चा सुरू झाली होती.



# ‘जॉब ट्रॅफिकिंग’मध्ये निमरत कौर

ऑनलाइन स्कॅमच्या जाळ्यात अनेक लोक अडकत असतात, परंतु अनेक स्कॅमर्स स्वत:च पीडित असतात हे तुम्हाला माहिती आहे का? या पार्श्वभूमीवर आगामी वेबसीरिज ‘जॉब ट्रॅफिकिंग’ लवकरच ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. जॉब ट्रॅफिकिंग सीरिजचा टीझर जारीकरत याची घोषणा करण्यात आली आहे. या सीरिजचे दिग्दर्शन प्रशांत नायर करत आहेत. सेलेक्ट मीडिया हॉल्डिंग्ज आणि चॉकबोर्ड एंटरटेनमेंटच्या बॅनर अंतर्गत निर्मित या सीरिजमध्ये निमरत कौर, रोशन मॅथ्यू, काव्या त्रेहान आणि पवन मल्होत्रा महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसून येतील. विदेशात नोकरी मिळविण्याची इच्छा बाळगणाऱ्यांची फसवणूक होत असते. जी गोष्ट एका संधीदाखल सुरु होते, ती लवकरच जिवंत राहण्याची लढाई ठरते असे याच्या टीझरच्या कॅप्शनदाखल म्हटले गेले आहे. 8 एपिसोड्सची ही थ्रिलर सीरिज अमेझॉन प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे. ही सीरिज प्रेक्षकांना ऑनलाइन स्कॅमच्या अंधारयुकत जगात नेणार आहे. सीरिजची कहाणी स्कॅमच्या मागे दडलेल्या पूर्ण नेटवर्कला समोर आणते. सीरिज तीन अनोळखी लोकांच्या अवतीभवती घुटमळणारी आहे, ज्यात एक स्कॅमर असून तो या जाळ्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत आहे, एक फसवणुकीची शिकार ठरलेली गृहिणी असून ती उत्तरांचा शोध घेत आहे, तर एक सीईओ या पूर्ण खेळादरम्यान अडकून पडलेला असतो.



# प्राजक्ता माळीची मुंबईत मोठी गुंतवणूक!

महाराष्ट्राची हास्यजत्रा या लोकप्रिय कार्यक्रमातून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री प्राजक्ता माळी सध्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. प्राजक्ताने मुंबईत तब्बल ६.४२ कोटी रुपयांचा आलिशान फ्लॅट खरेदी केला आहे. विशेष म्हणजे, मुंबईतील गोरेगाव पूर्व भागातील प्रसिद्ध ओबेरॉय एक्सक्युझिट या प्रोजेक्टमध्ये तिने हा फ्लॅट घेतला आहे. मालमत्ता नोंदणीशी संबंधित कागदपत्रांनुसार, प्राजक्ताने १२ ऑगस्ट २०२६ रोजी या घराच्या व्यवहाराची नोंद केली. हा फ्लॅट इमारतीच्या २८व्या मजल्यावर असून त्याचे कार्पेट एरिया सुमारे ९९६ चौरस फूट आहे. या घरासोबत २४० चौरस फुटांची टँडम कार पार्किंगची जागाही मिळाली आहे. प्राजक्ता माळीने हा फ्लॅट नूर खान आणि युसूफ अली खान यांच्याकडून खरेदी केल्याची माहिती मालमत्ता नोंदणीच्या कागदपत्रांमधून समोर आली आहे. या फ्लॅटची एकूण किंमत ६.४२ कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. या व्यवहारासाठी प्राजक्ताने तब्बल ३२.१२ लाख रुपये स्टॅम्प ड्युटी भरली आहे. याशिवाय ३० हजार रुपये नोंदणी शुल्कही भरावे लागले आहे. त्यामुळे घराच्या किमतीसोबतच या व्यवहारासाठीचा अतिरिक्त खर्चही मोठा आहे. प्राजक्ताने या आलिशान घरासाठी मोठ्या प्रमाणात होम लोन घेतल्याची माहितीही समोर आली आहे. ६.४२ कोटी रुपयांच्या फ्लॅटसाठी तिने इंडियन बँकेकडून ५.७८ कोटी रुपयांचे होम लोन घेतले आहे. हे कर्ज २८ जुलै २०२६ रोजी मंजूर झाल्याचे कागदपत्रांमध्ये नमूद आहे. म्हणजेच फ्लॅटच्या एकूण किमतीपैकी जवळपास ९० टक्के रक्कम होम लोनच्या माध्यमातून देण्यात आली आहे. उर्वरित रक्कम आणि व्यवहाराशी संबंधित इतर खर्च प्राजक्ताने स्वतः केला आहे. प्राजक्ता माळीने मुंबईत याआधीही घर खरेदी केल्याची माहिती आहे. त्यामुळे ही तिची मुंबईतील दुसरी मोठी घरखरेदी असल्याचे वृत्त आहे. अभिनय, सूत्रसंचालन आणि इतर कामांमधून प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण करणाऱ्या प्राजक्ताने आता मुंबईतील प्रीमियम प्रॉपर्टीमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. प्राजक्ताने ज्या ओबेरॉय एक्सक्युझिटमध्ये घर घेतले आहे, त्या प्रोजेक्टमध्ये यापूर्वी अनेक प्रसिद्ध कलाकारांनीही गुंतवणूक केली होती. बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांनी या सोसायटीमध्ये दोन फ्लॅट खरेदी केले होते. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२५ मध्ये अमिताभ बच्चन यांनी हे दोन्ही फ्लॅट प्रत्येकी ६ कोटी रुपये, म्हणजेच एकूण १२ कोटी रुपयांना विकले. त्यांनी हे फ्लॅट २०१२ मध्ये एकूण ८.१२ कोटी रुपयांना खरेदी केले होते. त्यामुळे सुमारे १३ वर्षांमध्ये त्यांच्या गुंतवणुकीवर ४७ टक्के नफा झाल्याचे सांगितले जाते.

# पहिल्याच बॉलवर पाकचा ओपनर फेल

## कपिल देव यांच्या ४३ वर्षे जुन्या विक्रमाशी बरोबरी; रॉबिन्सनने अझान अवैसला तंबूत धाडले

**महाईन्यूज । लंडन**

**इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेची सुरुवात अशा धक्कादायक रीतीने होईल, याची कल्पना खुद्द पाकिस्तान संघानेही केली नसेल. पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी, पहिल्याच चेंडूवर पाकिस्तानचा सलामीवीर अझान अवैस बाद झाला. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात पाकिस्तानचा फलंदाज सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर बाद होण्याची ही केवळ दुसरीच वेळ आहे. तर दुसरीकडे, इंग्लंडच्या गोलंदाजाने कसोटीच्या पहिल्या चेंडूवर बळी टिपण्याची किमया चौथ्यांदा करून दाखवली आहे.**




### मिचेल स्टार्क आणि मोहम्मद सिराजला टाकले मागे

जोश टंगने चालू डब्ल्यूटीसी सायकलमधील १० कसोटी सामन्यांत ५० विकेट्स घेत अव्वल स्थान पटकावले आहे. या यादीत ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क ४८ विकेट्ससह दुसऱ्या, तर भारताचा मोहम्मद सिराज ४१ विकेट्ससह तिसऱ्या स्थानावर आहे. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स ३९ विकेट्ससह चौथ्या आणि वेस्ट इंडिजचा जेडन सील्स ३५ विकेट्ससह पाचव्या क्रमांकावर आहे. या सायकलमध्ये टंगने आतापर्यंत तब्बल तीन वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा जास्त विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे. टंगने या सायकलमध्ये तीन वेळा एका डावात पाच किंवा अधिक विकेट्स घेतल्या आहेत.

तीन कसोटी सामन्यांच्या या मालिकेतील पहिल्या लढतीला आजपासून प्रारंभ झाला. नाणेफेक जिंकून पाकिस्तानचा संघ फलंदाजीसाठी मैदानात उतरला असता, इंग्लंडचा वेगवान गोलंदाज ऑली रॉबिन्सनने पहिल्याच चेंडूवर अझान अवैसला तंबूत धाडले. पाकिस्तानच्या बाबतीत तब्बल ४३ वर्षांनंतर या इतिहासाची पुनरावृत्ती झाली आहे. यापूर्वी १९८३ मध्ये भारताचे महान अष्टपैलू खेळाडू कपिल देव यांनी पाकिस्तानच्या मोहसिन खानला सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर बाद केले होते. आता इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतर पुन्हा एकदा पाकिस्तानच्या सलामीवीरावर ही नामुष्की ओढवली आहे.

सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर गडी बाद करणारा ऑली रॉबिन्सन हा इंग्लंडचा चौथा गोलंदाज ठरला आहे. इंग्लंडकडून सर्वप्रथम १९२६ मध्ये मॉरिस टेट यांनी ऑस्ट्रेलियाच्या वॉरन बार्डस्ले यांना पहिल्या चेंडूवर बाद केले होते. त्यानंतर १९७४ मध्ये इंग्लंडच्या जिऑफ अर्नोल्ड यांनी भारताचे महान फलंदाज सुनील गावस्कर यांना, तर २००७ मध्ये रायन साइडबॉटम यांनी वेस्ट इंडिजच्या डॅरेन गंगाला सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर तंबूत पाठवले होते. आता या विशेष यादीत ऑली रॉबिन्सनच्या नावाचाही समावेश झाला आहे.

दरम्यान, या कसोटी मालिकेसाठी बाबर आझमकडे कर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली होती; मात्र सराव सामन्यादरम्यान झालेल्या दुखापतीमुळे तो पहिल्या कसोटीतून बाहेर पडला आहे. त्याच्या अनुपस्थितीत सलमान अली आगा पाकिस्तान संघाचे नेतृत्व करत आहे. दुसऱ्या बाजूला, बेन स्टोक्सच्या निवृत्तीनंतर इंग्लंडने पुन्हा एकदा जो रूटकडे कर्णधारपदाची सूत्रे सोपवली आहेत. पाकिस्तानचा संघ नुकताच वेस्ट इंडिजविरुद्धची दोन सामन्यांची मालिका बरोबरीत सोडवून या मालिकेत उतरला आहे. त्यामुळे या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघ कशी कामगिरी करतात, याकडे क्रिकेट विश्वाचे लक्ष लागले आहे.

इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यात लीड्सच्या हेडिंग्ले मैदानावर सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोश टंगने आपल्या भेदक माऱ्याने धुमाकूळ घातला. टंगने अवघ्या ९.१ षटकांत ४६ धावा देऊन पाकिस्तानच्या निम्मा संघाला (५ विकेट्स) तंबूत धाडले. या धडाकेबाज कामगिरीसह जोश टंगने चालू जागतिक कसोटी अजिंक्यपद सायकलमध्ये ५० विकेट्सचा टप्पा गाठणारा जगातील पहिला गोलंदाज बनण्याचा ऐतिहासिक मान मिळवला आहे.

# स्पेनने मोडला ऑस्ट्रेलियाचा सर्वात मोठा रेकॉर्ड! जगातील पहिलाच क्रिकेट संघ

**महाईन्यूज । स्पेन**

**स्पेन म्हटलं की सर्वांना फुटबॉल आठवतं. कारण स्पेनने काही दिवसांपूर्वीच बलाढ्य अर्जेंटिनाला फिफा वर्ल्डकप स्पर्धेतील अंतिम सामन्यात पराभूत करुन वर्ल्ड चॅम्पियन होण्याचा मान पटकावला. पण स्पेनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वात बलाढ्य संघ ऑस्ट्रेलियाचा लागोपाठ सर्वाधिक सामने जिंकण्याचा रेकॉर्ड मोडून काढला आहे**



### स्पेनने मोडला ऑस्ट्रेलियाचा रेकॉर्ड

ऑस्ट्रेलियाचा संघ आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील बलाढ्य संघ आहे. पण ज्यावेळी ऑस्ट्रेलियाने हा रेकॉर्ड बनवला होता, त्यावेळी रिकी पॉंटिंग ऑस्ट्रेलियाचा कर्णधार होता. रिकी पॉंटिंगच्या नेतृत्वात ऑस्ट्रेलियाने कसोटी आणि वनडे मिळून एकूण २० सामने जिंकले होते. हा पराक्रम ऑस्ट्रेलियाने २००३ मध्ये करुन दाखवला होता. त्यानंतर वेस्ट इंडिजविरुद्ध झालेल्या चौथ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाला पराभवाचा सामना करावा लागला होता. या पराभवासह ऑस्ट्रेलियाचा विजयरथ थांबला होता. या विजयरथामुळे ऑस्ट्रेलियाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले होते.

स्पेनने लागोपाठ २४ आंतरराष्ट्रीय सामने जिंकून वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

स्पेनचा संघ फिनलँडमध्ये सुरू असलेली आयसीसी टी-२० वर्ल्डकप सब रिजनल यूरोप क्वालिफायर स्पर्धा खेळण्यात व्यस्त आहे. याआधी १४ ऑगस्टला झालेल्या सामन्यात स्पेन आणि फिनलँड हे दोन्ही संघ आमनेसामेन आले होते. हा सामना जिंकून स्पेनने ऑस्ट्रेलियाचा लागोपाठ सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने जिंकण्याचा विक्रम मोडून काढला होता. त्यानंतर बुल्गारिया, लक्जमबर्ग आणि आईल ऑफ मॅन या संघांना हरवल्यानंतर स्पेनने लागोपाठ २४ सामने जिंकण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

कसोटी क्रिकेट खेळणाऱ्या देशांमध्ये लागोपाठ सर्वाधिक सामने जिंकण्याचा रेकॉर्ड हा अजूनही ऑस्ट्रेलियाच्या नावे कायम आहे. पण एकूण आतंरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आता लागोपाठ सर्वाधिक सामने जिंकण्याचा रेकॉर्ड स्पेनच्या नावावर आहे. पॉंटिंगच्या नेतृत्वात खेळताना ऑस्ट्रेलियाने लागोपाठ १७ वनडे आणि ३ कसोटी सामने जिंकले होते. आता स्पेनचा संघ या रेकॉर्डमध्ये खूप पुढे निघून गेलेला नाही. तसेच भारतीय संघाच्या नावे लागोपाठ सर्वाधिक १२ सामने जिंकण्याची नोंद आहे. २०१७ मध्ये भारतीय संघाने लागोपाठ १२ सामने जिंकले. पण १३ व्या सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला होता. या विक्रमी कामगिरीमुळे स्पेनने क्रिकेट विश्वाचे लक्ष वेधून घेतले असून, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सलग विजयांची ही मालिका कायम ठेवत स्पेनचा संघ आगामी सामन्यांमध्येही हा विक्रम आणखी उंचावण्याच्या प्रयत्नात असेल.

स्मार्ट PCMC
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
दि. 21 ऑगस्ट 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# फेरप्रस्तावामुळे विषय पुन्हा रखडला

## नामनिर्देशित सदस्य नियुक्तीत प्रशासनाचा घोळ; महापालिका प्रशासनाची अधिकृत कबुली

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीसारख्या नियमाधारित विषयातही प्रस्ताव वारंवार त्रुटीयुक्त ठरल्याचे अधिकृत कागदपत्रांतून समोर आले आहे. विशेष म्हणजे, "सदरचा विषय प्रशासनाकडून अर्धवट व चुकीच्या पद्धतीने सादर झाला असून यापूर्वी देखील महापालिका सभेत त्यामध्ये सुचविण्यात आले होते," अशी स्पष्ट नोंद नगरसचिव कार्यालयाने सभा ठराव क्र. ३४ अंतर्गत केलेल्या अधिकृत उपसूचनेत केली आहे.**



महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित नगरसेवकांची अर्हता व नियुक्ती) नियम, २०१२ नुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेत १० नामनिर्देशित सदस्य नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. महापालिकेतील १२८ निवडून आलेल्या सदस्यांच्या पक्षीय तौलनिक संख्याबळानुसार भाजपा व अपक्ष नगरसेविका आघाडीला ७, तर नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टीला ३ जागा, असे ७+३ प्रमाण प्रशासनाने प्रस्तावित केले होते.

महापालिका आयुक्तांनी २४ फेब्रुवारी, २ मार्च आणि ४ मार्च २०२६ रोजी संबंधित गटनेत्यांना चर्चेसाठी बोलावले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते तथा विरोधी पक्षनेते भाऊसाहेब सोपानराव भोईर यांनी ४ मार्च रोजी तीन नावे आवश्यक कागदपत्रांसह आयुक्तांकडे सादर केली. त्यानंतर छाननी समिती तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत संबंधित कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. महापालिका सभा ठराव क्र. ०८, दि. १३ मार्च २०२६ आणि त्यानंतरच्या पत्रव्यवहाराच्या आधारे प्रशासनाने गटनेत्यांशी विचारविनिमय करून ७+३ अशा एकूण १० नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीची शिफारस सभेकडे केली होती.

दरम्यान, या प्रशासकीय गोंधळाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न झाल्याचेही चित्र आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संभाव्य नामनिर्देशित सदस्य राजेंद्र जगताप, सीमा सावळे आणि फझल शेख हे सभागृहात येऊ नयेत म्हणून विषय लांबविला जात असल्याचा दावा करण्यात आला. हे सदस्य सभागृहात आल्यास भाजपाला आव्हान निर्माण होईल, अशा स्वरूपाचा राजकीय प्रचारही झाल्याचे बोलले जात आहे.

मात्र उपलब्ध अधिकृत कागदपत्रे पाहता, सर्वप्रथम प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होतो. १५ जूनच्या अधिकृत नोंदीतच प्रस्ताव "अर्धवट व चुकीच्या पद्धतीने सादर" झाल्याचे नमूद असल्याने, विषय रखडण्यामागे नेमकी प्रशासकीय चूक होती की राजकीय दबाव, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. महापालिका ही नागरिकांच्या करातून चालणारी स्थानिक स्वराज्य संस्था आहे. प्रशासनाकडून सभागृहासमोर मांडला जाणारा प्रत्येक प्रस्ताव कायदे, नियम आणि संबंधित कागदपत्रांची पडताळणी करूनच सादर होणे अपेक्षित आहे. प्रस्तावात मूलभूत त्रुटी राहिल्यास प्रशासनाचा वेळ तर जातोच; मात्र सभागृहाचा मौल्यवान वेळ आणि सार्वजनिक यंत्रणेची कार्यक्षमताही खर्ची पडते. एका प्रस्तावात अनवधानाने त्रुटी होऊ शकते. मात्र त्याच विषयात वारंवार दुरुस्ती, फेरप्रक्रिया आणि फेरप्रस्तावाची वेळ येत असेल, तर हा केवळ तांत्रिक दोष न राहता प्रशासकीय उत्तरदायित्वाचा प्रश्न बनतो.

### प्रस्तावातच राहिल्या त्रुटी

सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्याचे दिसत असतानाच हा विषय २० एप्रिल २०२६ रोजीच्या सभेत ठराव क्र. १० म्हणून मांडण्यात आला. मात्र प्रस्ताव योग्य पद्धतीने सादर न झाल्याने त्यावर पुन्हा प्रक्रिया करण्याची वेळ आली. त्यानंतर १५ जून २०२६ रोजीच्या सभा क्र. ०६ मधील ठराव क्र. ३४ मध्ये नगरसचिव कार्यालयाने केलेल्या अधिकृत उपसूचनेत प्रशासनाची चूक स्पष्टपणे नमूद करण्यात आली. यामुळे विषय पहिल्यांदा त्रुटीयुक्त स्वरूपात सभागृहासमोर आला, त्यानंतर दुरुस्ती करण्यात आली आणि पुन्हा "फेर प्रक्रिया करून फेर दुरुस्ती करून संपूर्ण संख्येसह" विषय सभेसमोर आणण्याची वेळ आली. त्यामुळे नामनिर्देशित सदस्य नियुक्तीचा विषय किमान तीन वेळा प्रक्रियेच्या फेऱ्यात अडकल्याचे दिसते.

### ऑगस्टमध्येही प्रश्न कायम

या प्रकरणातील आणखी महत्त्वाची बाब म्हणजे महापौरांनी १२ ऑगस्ट २०२६ रोजी स्वतंत्र पत्र क्र. महा/काविई/२०६०/२०२६ काढले आहे. यावरून फेब्रुवारी-मार्चमध्ये सुरू झालेली प्रक्रिया ऑगस्टपर्यंत पूर्ण झालेली नसल्याचे स्पष्ट होते. तब्बल पाच-सहा महिने उलटूनही नियमाधारित विषय अंतिम टप्प्यावर पोहोचलेला नाही. आता हा विषय पुन्हा सर्वसाधारण सभेच्या अजेंड्यावर पहिल्या क्रमांकावर असल्याचे समोर आले आहे.

## शालेय विद्यार्थ्यांनी जाणून घेतले अग्निसुरक्षेचे महत्त्व; अग्निशमन दलाच्या जवानांनी दिले प्रात्यक्षिक

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांमध्ये अग्निसुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी विशेष अग्निसुरक्षा जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत रायका स्कूल, पिंपळे सौदागर येथील विद्यार्थ्यांसाठी पिंपरी मुख्य अग्निशमन केंद्र येथे अग्निसुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**




उप आयुक्त व्यंकटेश दुर्वास यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या या अभियाना अंतर्गत लीडिंग फायरमन नामदेव वाघे यांनी विद्यार्थ्यांना अग्निशमन विभागाच्या कार्यपद्धतीची तसेच आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन व बचाव पथकांकडून करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती दिली. तसेच आपदा मित्र संतोष शेलार, अफसाना पठाण, गीतेश बांगरे यांनी विद्यार्थ्यांना अग्निशमन वाहनांची पाहणी करून त्यामध्ये असलेली विविध उपकरणे, अग्निशमन साहित्य आणि बचाव साधनांची माहिती व प्रात्यक्षिक दिले.

यावेळी आग लागल्यास घाबरून न जाता प्रसंगावधान राखणे, सुरक्षित ठिकाणी जाणे, धुरापासून स्वतःचा बचाव करणे आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य पद्धतीने प्रतिसाद देणे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आग लागल्यास तात्काळ अग्निशमन विभागाच्या १०१ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी अग्निशमन केंद्राची पाहणी करत जवानांशी संवाद साधला आणि अग्निशमन वाहने, उपकरणे व बचाव साहित्याविषयी उत्सुकतेने माहिती जाणून घेतली. प्रत्यक्ष पाहणी आणि संवादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अग्निशमन विभागाचे कार्य जवळून समजून घेण्याची संधी मिळाली.

लहान वयातच अग्निसुरक्षेबाबत योग्य माहिती आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांची जाणीव निर्माण झाल्यास आपत्कालीन परिस्थितीत विद्यार्थी अधिक सजगपणे व जबाबदारीने वागू शकतात. या उद्देशाने महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत शाळांमध्ये अग्निसुरक्षा जनजागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.


या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अग्निसुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद देण्याबाबत जागरूकता निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत अग्निसुरक्षेचे महत्त्व जाणून घेतले.

# वंदे मातरम् सन्मानासाठी भाजपाची एकजूट

## महापौर रवी लांडगे यांच्या निर्णयाला सत्ताधारी नगरसेवकांचा विरोध नव्हे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत गुरुवारी 'वंदे मातरम्' गीताच्या सन्मानार्थ सभा तहकूब करण्याच्या मागणीवरून काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, या घडामोडींचा अर्थ महापौर रवी लांडगे यांच्या निर्णयाला सत्ताधारी नगरसेवकांचा विरोध किंवा भाजपमधील अंतर्गत मतभेद असा काढणे योग्य ठरणार नसून, 'वंदे मातरम्'च्या सन्मानासाठी सत्ताधारी नगरसेवकांनी एकत्रितपणे भूमिका मांडल्याचे चित्र सभागृहात पाहायला मिळाले.**



सभेच्या प्रारंभी विविध प्रकल्पांचे सादरीकरण सुरू असताना विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी त्यावर आक्षेप घेतला. त्यानंतर नगरसेवक विनोद नढे यांनी 'वंदे मातरम्' गीताच्या सन्मानार्थ अभिनंदनाचा ठराव मांडत सभा तहकूब करण्याची मागणी केली.

या मागणीवर सभागृहात विविध मतप्रवाह समोर आले. महापौर रवी लांडगे यांनी नियमित कामकाज सुरू ठेवण्याची भूमिका घेतली. त्यानंतर भाजपचे नगरसेवक महापौरांच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत एकत्र आले. यावेळी 'भारत माता की जय'च्या घोषणा देण्यात आल्या. त्यामुळे काही काळ सभागृहातील वातावरण उत्स्फूर्त आणि तापलेले पाहायला मिळाले. या घडामोडींकडे महापौरांच्या निर्णयाला विरोध म्हणून पाहिले जात असले, तरी भाजप नगरसेवकांची भूमिका ही 'वंदे मातरम्'च्या सन्मानाशी संबंधित असल्याचे सत्ताधारी गटाकडून स्पष्ट करण्यात आले. राष्ट्रभावनेशी निगडित विषय असल्याने त्याचा योग्य सन्मान व्हावा, यासाठी नगरसेवकांनी आपली भूमिका सभागृहात मांडली.

दरम्यान, विरोधी पक्षातील नगरसेवक संदीप वाघेरे यांनी सभा दहा मिनिटांसाठी तहकूब करून त्यानंतर पुन्हा सुरू करण्याचा पर्याय सुचविला. तसेच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनीही आपापल्या भूमिका मांडल्या. त्यामुळे काही काळ सभागृहात घोषणाबाजी आणि चर्चा सुरू राहिली.

परिस्थितीचा आढावा घेत महापौर रवी लांडगे यांनी अखेर सभा तहकूब करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे 'वंदे मातरम्'च्या सन्मानाचा मुद्दा मार्गी लागला आणि सभागृहातील वातावरणही शांत झाले.

### अंतर्गत मतभेदांच्या चर्चेला पूर्णविराम

या घटनेनंतर भाजपमध्ये महापौर आणि पक्षनेतृत्व यांच्यात मतभेद असल्याच्या चर्चांना राजकीय वर्तुळात उधाण आले असले, तरी सभागृहातील प्रत्यक्ष घडामोडींचा संदर्भ पाहता हा निष्कर्ष घाईचा ठरू शकतो. राष्ट्रभावनेशी संबंधित विषयावर सत्ताधारी नगरसेवकांनी एकत्रितपणे भूमिका घेतल्याचेच या घटनेतून स्पष्ट झाले. महापौर रवी लांडगे यांनीही परिस्थितीचा विचार करून सभा तहकूब करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे महापौर आणि सत्ताधारी नगरसेवक यांच्यात संघर्ष निर्माण झाला, असा अर्थ काढण्यापेक्षा राष्ट्रभावनेच्या विषयावर सभागृहात झालेल्या चर्चेचा तो भाग असल्याचे मानले जात आहे.

### विकासकामांवरील चर्चेकडे आता लक्ष

महापालिका सभागृहात शहरातील विविध विकासकामे, प्रकल्प आणि नागरिकांच्या प्रश्नांवर चर्चा होणे अपेक्षित आहे. त्यामुळे पुढील सभेत प्रलंबित विकासकामे आणि नागरिकांच्या प्रश्नांवर प्रभावी चर्चा होण्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. 'वंदे मातरम्'च्या सन्मानाचा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांनी आपापली भूमिका मांडली. अखेर महापौरांनी सभा तहकूब करून परिस्थितीला पूर्णविराम दिला. त्यामुळे या घटनेकडे केवळ राजकीय संघर्ष म्हणून न पाहता, राष्ट्रभावनेशी संबंधित विषयावर सभागृहात उमटलेल्या विविध प्रतिक्रियांच्या पार्श्वभूमीवर पाहणे अधिक योग्य ठरणार आहे.

# भटक्या कुत्र्यांच्या दहशतीविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आक्रमक!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शहरातील वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी महापालिका प्रशासनाला धारेवर धरले. लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पादचाऱ्यांना रस्त्यावरून सुरक्षितपणे चालणे कठीण झाले असून, नागरिकांवर श्वानदंशाच्या गंभीर घटना घडत असतानाही प्रशासन निष्क्रिय असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने महापालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावर आंदोलन करण्यात आले.**




शहरातील विविध भागांत भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली असून, त्यांच्या टोळ्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना कुत्र्यांच्या हल्ल्याचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी भोईर यांनी केली.

शहरातील सर्व प्रभागांमध्ये भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण आणि अँटी-रेबीज लसीकरणाची मोहीम युद्धपातळीवर राबवावी, अशी प्रमुख मागणी आंदोलनातून करण्यात आली. तसेच नागरिकांवर हल्ले करणाऱ्या आक्रमक कुत्र्यांना पकडण्यासाठी विशेष पथके तैनात करावीत, अशी मागणीही करण्यात आली. श्वानदंशाच्या घटना घडल्यानंतर नागरिकांना उपचारासाठी धावपळ करावी लागू नये, यासाठी महापालिकेच्या प्रत्येक रुग्णालयात रेबीज प्रतिबंधक लस आणि अत्यावश्यक औषधांचा पुरेसा साठा २४ तास उपलब्ध ठेवावा, अशी मागणी भोईर यांनी केली. नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी स्वतंत्र २४×७ हेल्पलाइन सुरू करण्याची मागणीही करण्यात आली.

"पिंपरी-चिंचवडकरांचा हा जीवघेणा त्रास आणि दहशतीचे वातावरण आता खपवून घेतले जाणार नाही. करदात्या नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या प्रशासनाला हा थेट इशारा आहे," असे भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले.

महापालिका प्रशासनाने पुढील काही दिवसांत भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर ठोस उपाययोजना न केल्यास यापेक्षाही तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा भोईर यांनी दिला. "नागरिकांच्या हक्कासाठी आणि सुरक्षेसाठी आमचा लढा सुरूच राहील," असेही त्यांनी स्पष्ट केले.

> "पिंपरी-चिंचवडकरांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या महापालिका प्रशासनाला आता जागे करण्याची वेळ आली आहे. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना रस्त्यावरून चालताना भटक्या कुत्र्यांची भीती वाटत असेल, तर ही प्रशासनाची मोठी नामुष्की आहे. नसबंदी, लसीकरण आणि आक्रमक कुत्र्यांचा बंदोबस्त तातडीने करा. आता आश्वासन नको, प्रत्यक्ष कारवाई हवी; अन्यथा महापालिकेच्या दारात यापेक्षाही तीव्र जनआंदोलन छेडू."
>
> **- भाऊसाहेब भोईर, विरोधी पक्षनेते, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# डॉ. डी. वाय. पाटीलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

## प्रतिभा ग्रुपमध्ये परदेशी भाषा केंद्र सुरू करण्याची डॉ. दीपक शहा यांची घोषणा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**डॉ. डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस, वराळे येथे देशभक्तीपूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यास महाविद्यालयातील विद्यार्थी, सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**







महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. सुशांत पाटील तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. अनुजा पाटील यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. शिरबहादूरकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय वायुदलातील निवृत्त ग्रुप कॅप्टन राजेश तिवारी उपस्थित होते. यावेळी रजिस्ट्रार नामदेव वेताळे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने करण्यात आली. राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली आणि त्यानंतर राष्ट्रगीताचे सामूहिक गायन झाले. राष्ट्रगीताच्या स्वरांनी संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला.

प्रमुख पाहुणे ग्रुप कॅप्टन राजेश तिवारी यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा, शिस्त, प्रामाणिकपणा आणि जबाबदार नागरिकत्वाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्यांचा उपयोग देशाच्या विकासासाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी भारतीय वायुदलातील करिअरच्या विविध संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भारतीय वायुदलामध्ये अभियांत्रिकी, तांत्रिक सेवा, विमान देखभाल, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक, माहिती-तंत्रज्ञान तसेच विविध तांत्रिक क्षेत्रांत करिअरच्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. शैक्षणिक पात्रतेसोबतच शिस्त, तांत्रिक कौशल्य, नेतृत्वगुण, शारीरिक तंदुरुस्ती आणि देशसेवेची भावना विद्यार्थ्यांनी विकसित करावी, असे त्यांनी नमूद केले.

भारतीय वायुदलातील सेवा ही केवळ नोकरी नसून राष्ट्रसेवेची आणि अभिमानाची संधी आहे, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात उत्कृष्टतेचा ध्यास घेत देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असेही त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. एस. डी. शिरबहादूरकर यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व विशद करताना स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण करून दिली. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून प्रेरणा घेऊन जबाबदार नागरिक बनावे आणि देशाच्या विकासामध्ये सक्रिय योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले. यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध देशभक्तिपर आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. विविध सादरीकरणांमधून देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रभक्तीचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हिमांशी शेळके आणि प्रा. श्रुती इंगोले यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. त्यांच्या उत्कृष्ट सूत्रसंचालनामुळे संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, सुरळीत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ८० वा स्वातंत्र्य दिन सोहळा संस्मरणीय ठरला.

# जागृती मंचतर्फे "AI Poster Presentation Challenge" स्पर्धेचे आयोजन

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळंदी येथील जागृती मंचतर्फे "Hack the Problem, Build the Future – AI Poster Presentation Challenge" या संकल्पनेवर आधारित AI पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन १८ ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले.**




विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनातील तसेच सामाजिक समस्या ओळखून त्यावर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) माध्यमातून नाविन्यपूर्ण, व्यवहार्य व समाजोपयोगी उपाय सुचवावेत, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, नवोपक्रमशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सादरीकरण कौशल्यांना चालना मिळाली. स्पर्धेसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आरोग्य व कल्याण, शिक्षण व कौशल्य विकास, पर्यावरण व शाश्वतता, स्मार्ट व सर्वसमावेशक समाज तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा नैतिक व जबाबदार वापर हे उपविषय देण्यात आले होते. स्पर्धकांना वास्तविक समस्या, त्यावरील AI-आधारित उपाय आणि त्या उपायाचा अपेक्षित परिणाम यांचा विचार करून पोस्टर तयार करण्यासाठी ६० मिनिटांचा कालावधी देण्यात आला.

स्पर्धेतील पोस्टरचे परीक्षण प्रमुख पाहुणे श्री. नारायण भास्कर बांगर आणि डॉ. सुनील महाजन, विद्यार्थी व्यवहार विभागाचे सहयोगी अधिष्ठाता यांनी केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकता, नाविन्यपूर्णता, विषयाची उपयुक्तता, समस्या-निराकरणाची परिणामकारकता आणि AI च्या योग्य वापराच्या आधारे पोस्टरचे मूल्यमापन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. नारायण भास्कर बांगर हे सामाजिक कार्यकर्ते असून टाटा मोटर्स लिमिटेड, पिंपरी, पुणे येथे कार्यरत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना नवोपक्रम, सामाजिक बांधिलकी आणि समाजोपयोगी तंत्रज्ञानाच्या वापराबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे, विद्यार्थी व्यवहार विभागाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील महाजन, जागृती मंच समन्वयक प्रा. रश्मी पाठक, कार्यक्रम समन्वयक डॉ. ज्योती बच्छाव तसेच जागृती मंचाच्या संपूर्ण टीमचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

स्पर्धेच्या समारोपप्रसंगी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध सामाजिक समस्यांवर AI-आधारित अभिनव उपाय मांडले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदार वापर, सर्जनशील विचार, समस्या-निराकरणाची क्षमता आणि समाजोपयोगी नवकल्पना विकसित करण्याची प्रेरणा निर्माण झाली. "समस्या सोडवा, भविष्य घडवा" या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना भविष्यातील जबाबदार, नाविन्यपूर्ण आणि तंत्रज्ञानस्नेही समस्या-निराकरणकर्ते बनण्याची दिशा मिळाली.

**DTE Code 6310**

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan **61 Lakh P.A.**

Average Salary Package **5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:

**8830992988 / 7423080910 / 9028101155**



Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507